MHAU060023352022

## नियमित दिवाणी दावा क्र.३८७/२०२२ मध्ये निशाणी २५ लगत हुकूम

**( विलास गिरी वि. कल्याण गिरी व इतर )**

प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज वादीचा दावा रद्दबादल करण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दाखल करुन असे कथन केले आहे की, वादी याने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांच्या विरुध्द निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी सदर दावा दाखल करत असताना अपुर्ण कोर्ट फि भरलेली आहे. तसेच वाद मिळकतीचा चतुःसिमा या चुकीच्या नोंदविलेल्या आहेत. वादी यांनी त्यांच्या दाव्यात असे बदल केलेले आहे की, वाद मिळकती पैकी काही मिळकत शासन संपादित झालेली आहे. परंतु सदर दाव्यात वादी यांनी त्यांना अवश्यक पक्षकार केलेले नाही. तसेच सदर दाव्यामध्ये वादी यांनी त्यांची मालकी घोषीत होवून मिळण्याची मागणी केलेली नाही. सबब, या सर्व कारणास्तव सदर दावा हा कायद्यान्वये चालु शकत नाही, त्यामुळे सदर दावा रद्द करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

३. सदर अर्जावर वादी यांनी आपले म्हणणे देवून असे कथन केले आहे की, सदर दावा हा मौजे टाकळी (ल.) ता. कन्नड येथील गट क्र.४ पैकी ५ आर जमिनीबाबत निरंतर मनाई हुकूम मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी महाराष्ट्र कोर्ट फिस अॅक्ट कलम ६ अन्वये निरंतर मनाई हुकूमाबाबतची कायदेशीर फि भरलेली आहे. सदर दाव्यात प्रतिवादी यांनी लेखी कैफियत व म्हणणे दाखल केलेले आहे. सदर कैफियतीत प्रतिवादी यांनी कोर्ट फि संदर्भात, वाद मिळकतीच्या चतुःसिमा संदर्भात कोणताही आक्षेप नोंदविलेला नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

४. वादीने दाखल केलेल्या दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी सदरचा दावा मौजे टाकळी (ल.) ता. कन्नड येथील जमिन गट क्र.४ पैकी ५ आर क्षेत्रावर प्रतिवादी यांनी हरकत अडथळा करु नये अशा निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. अभिलेखावरील वादी यांनी दाखल केलेल्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन करता प्रथमदर्शनी असे दिसून येते की, शिवना टाकळी मध्यम प्रकल्प कार्यकारी अभियंता औरंगाबाद या प्रकल्पात गट क्र.४ पैकी ३ हेक्टर ५३ आर इतकी मिळकत फेरफार क्र.१३५६ ने संपादित करण्यात आल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सदर मिळकती पैकी काही मिळकत शिवना प्रकल्पात संपादित झाल्याबाबतची बाब प्रतिवादी यांनी, त्यांच्या कैफियतीत प्रथमदर्शनी नाकारल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या निशाणी १४ कडील कैफियतीत वाद मिळकतीच्या चतुःसिमा बाबत तसेच कोर्ट फि बाबत कोणताही उल्लेख केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाहीत. सदर दावा हा वादी यांनी निरंतर मनाई हुकूम मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सदर अर्ज न्यायनिर्णयीत करीत असताना मी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवत आहे. ***(Anathula Sudhakar Vs. P. Buchi Reddy (Dead) By Lrs. & Ors on 25 March, 2008 held in para 17*** *"The suits for prohibitory injunction relating to immovable property, is as under : (a) Where a cloud is raised over plaintiffs title and he does not have possession, a suit for declaration and possession with or without a consequential injunctions, is the remedy. Where the plaintiff title is not in dispute or under a cloud, but he is out of possession, he has to sue for possession with a consequential injunction. Where there is merely an interference with plaintiff's lawful possession or threat of dispossession, it sufficient to sue for an injunction simpliciter".)* सदर दाव्यात वादी यांनी असे कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी क्र.१ चे वडील नामे आसाराम पुंजाबा गिरी हे दावा मिळकतीचे मालक व कब्जेदार होते. ते मयत झाल्यानंतर वादी व प्रतिवादी क्र.१ चे नावे व इतरांच्या नावे फेरफार क्र.६३९ मंजुर करण्यात येवून त्यांची नावे ७/१२ उताऱ्यास वारसाने घेण्यात आलेली आहे. त्यानंतर दावा मिळकत गट क्र.४ व गट क्र.११८ बाबत वादी व प्रतिवादी क्र.१ यांच्यात वाटण्या झाल्या त्यानुसार दावा मिळकत गट क्र.४ पैकी ३ हेक्टर ४७ आर

जमिन फेरफार क्र.९३७ चे नोंदीनुसार प्रतिवादी क्र.१ यास व ५ आर जमिन वादीस व गट क्र.११८ क्षेत्र ९० आर संपुर्ण जमिन वादीचे वाटणीस आले व त्याबाबत फेरफार क्र.९३७ मंजुर करण्यात आलेले आहे. अभिलेखाचे अवलोकन करता प्रथमदर्शनी असे दिसून येते की, वादी यांनी वाद मिळकतीचा ताबा मागितलेला नाही. तसेच वाद मिळकत ही वादी यांच्या ताब्यात व मालकीचे असल्याबाबतचे कथन केलेले आहे. सदर दावा हा निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल करण्यात आलेला आहे. सदर दावा हा शाबीत करण्याची जबाबदारी प्रथमदर्शनी वादी यांची आहे. तसेच सदर दाव्यातील वाद मिळकतीवर ताबा असल्याबाबतचा व तसेच वादीच्या ताब्यास प्रतिवादी हे हरकत अडथळा करत असल्याबाबतची बाब शाबीत करणे ही देखील वादी यांची जबाबदारी असणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज निशाणी २५ नामंजुर करण्यात येत आहे.

२. दंडाविषयी आदेश नाही.

22.11.23.

ठिकाणः कन्नड.
दिनांकः २२.११.२०२३

**( श्रीमती अ.ई.आवटी )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कन्नड.